# ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

## ५वी प्रवेश २०२० – प्रक्रिया ओघ तक्ता

| ऑनलाईन प्रक्रिया | | प्रत्यक्ष प्रक्रिया |
|---|---|---|
| संकेतस्थळावर अर्ज काळजीपूर्वक भरावा व शुल्क ऑनलाईन भरावे. शुल्क नेट बँकिंग, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा वॉलेटद्वारा भरता येईल. पावतीची व अर्जाची प्रत लगेचच ईमेलने सुद्धा मिळेल. | **१. अर्ज मिळविणे, भरणे**<br>**मुदत: दि. ३ ते १५ फेब्रुवारी** | प्रशाला कार्यालयातून अर्ज घ्यावा व हाताने भरावा. किंमत रु. ५००/-<br>**कार्यालयाची वेळ :**<br>सोम. ते शुक्र. : स. ११.०० ते ५.००<br>शनिवार : स. ८.३० ते १२.०० |
| | **२. अर्ज जमा करणे.** | |
| आपला अर्ज आम्हाला आपोआपच मिळालेला असेल. आपल्याला आवश्यकता वाटल्यास त्याची प्रत काढून ठेवावी. | **३. प्रवेशपत्र मिळविणे.**<br>**सत्र व माध्यम तपासणे.** | प्रशालेत समक्ष येऊन भरलेला अर्ज द्यावा. |
| आपल्या मेल बॉक्समध्ये आलेल्या प्रवेशपत्राची प्रत काढावी व त्यावर चिकटवावे.प्रकाशचित्र | **४. प्रथम प्रवेश चाचणीला उपस्थित राहणे**<br>**प्रथम चाचणी : रवि. दि. २३ फेब्रुवारी**<br>**सत्र १: स. ८. ३० ते १०.३० किंवा**<br>**सत्र २: दु. १२.०० ते २.०० किंवा**<br>**सत्र ३ : दु. ३.३० ते ५.३०** | कार्यालयातून प्रवेशपत्र घ्यावे व त्यावर प्रकाशचित्र चिकटवावे. परीक्षेच्या दिवशी पाल्याबरोबर द्यावे. |
| निवडयादी संकेतस्थळावर उपलब्ध होईल अथवा दूरभाष क्रमांक ०२० २४२०७००० वर संपर्क करावा. तसा संदेश भ्रमणभाषवर येईल. | **५. निकाल: गुरूवार दि. १२ मार्च सायं. ५.०० वा.** | निवडयादी प्रशालेत उपलब्ध होईल. तसा संदेश भ्रमणभाषवर येईल. |
| | **६. प्रथम चाचणीमधून निवड झाल्यास द्वितीय चाचणी रवि. दि. १५ मार्च स. ८.०० ते १०.३०** | |
| निवडयादी संकेतस्थळावर उपलब्ध होईल अथवा दूरभाष क्रमांक ०२० २४२०७००० वर संपर्क करावा. तसा संदेश भ्रमणभाषवर येईल | **७.** अंतिम निवडयादी जाहीर<br>**शुक्रवार दि. २७ मार्च** सायं. ५.०० वा. | निवडयादी प्रशालेत उपलब्ध होईल. तसा संदेश भ्रमणभाषवर येईल. |
| | **८. प्रवेश शुल्क व शैक्षणिक शुल्क भरून प्रवेश घेणे. दि. १ एप्रिल ते १० एप्रिल**<br>**रु. ५,०००/- + ७०,०००/-** | |
| | **सहनिवास प्रवेश निश्चिती**<br>फक्त पहिल्या ५ विद्यार्थ्यांसाठी (गुणवत्तेप्रमाणे)<br>वार्षिक शुल्क रु. ५०,०००/- | |
| | **९. गणवेश व पुस्तके खरेदी** | |
| | **१०.गुरूवार दि. ११ जून २०२० शाळा सुरू** | |

# ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे
## ५वी प्रवेशचाचणीविषयी पालकांना सूचना

१. विद्यार्थ्यांनी आपल्याला मिळालेल्या सत्रानुसार चाचणीपूर्वी ३० मिनिटे हजर राहावे. सत्राची वेळ प्रवेशपत्रावर पाहावी.

२. दि. २३ फेब्रुवारीला **पहिल्या चाचणीच्या** वेळी येताना प्रकाशचित्र लावलेले ओळखपत्र, **काळ्या रंगाचे दोन बॉलपेन्स** आणावेत. **दुसऱ्या चाचणीसाठी** निवड झाल्यास दि. १५ मार्च रोजी परीक्षेला येताना **टोक केलेल्या दोन पेन्सिली, खोडरबर व टोकयंत्र** आणावे.

३. योग्य रांगेत योग्य क्रमांकावर बसवून घेण्यासाठी विद्यार्थ्याला त्याच्या प्रवेशपत्रावरील **गटक्रमांक** आणि **आसनक्रमांक** चांगल्या प्रकारे लक्षात असणे आवश्यक आहे . तसेच त्याचे प्रवेशपत्र त्याच्याजवळ असणे आवश्यक आहे. (पावती नसली तरी चालेल. प्रवेशपत्र मात्र अत्यावश्यक आहे.)

४. पालकांनी विद्यार्थ्यांच्या हातात आवश्यक साहित्य व प्रवेशपत्र देऊन त्याला प्रबोधिनीच्या वास्तूत सोडल्यानंतर चाचणी संपेपर्यंत विद्यार्थ्यांच्या सर्व प्रकारच्या अडीअडचणींची काळजी प्रबोधिनीतील अध्यापक आणि कार्यकर्ते घेत असतात. पालकांनी चौकात गर्दी केल्यास विद्यार्थ्यांना सूचना देणे अवघड होते व विद्यार्थी भांबावून जातात. त्यामुळे पालकांनी चौकात थांबू नये. त्यांच्यासाठी प्रबोधिनीतील शिक्षण पद्धतीची ओळख व्हावी यासाठी व्याख्यान योजलेले आहे.


५. पालकांना वर्गात जाण्यास अनुमती नसते. सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या सत्रानुसार पाचव्या मजल्यावरील सभागृहात रांगांमध्ये बसवून घेतले जाते आणि नंतर एकेका गटाला रांगेने चाचणीसाठी वर्गात नेले जाते.

६. चाचणी संपल्यानंतरही विद्यार्थ्यांना रांगेने तळमजल्यावरील चौकापर्यंत नेले जाते . आपल्या पाल्यास घेऊन जाण्यासाठी पालकांनी चौकामध्ये यावे .

७. कोणत्याही परिस्थितीत चाचणीचे सत्र बदलून मिळणार नाही.

८. उत्तरपत्रिका संगणकाद्वारे तपासली जाणार असल्याने विद्यार्थ्यांना योग्य उत्तराच्या ठिकाणी काळ्या शाईच्या बॉल पेनाने गोल भरावयाचा आहे. त्याचा सराव विद्यार्थ्यांकडून अवश्य करून घ्यावा. नमुन्यादाखल खाली उत्तर पत्रिका दाखविली आहे.

९. पालकांसाठी सकाळी ९.०० वाजता, दुपारी १२.३० व ४.०० वाजता मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले आहे. यापैकी कोणत्याही एका व्याख्यानास उपस्थित राहावे.



प्रज्ञा मानस संशोधिका
ज्ञानप्रबोधिनी
510, सदाशिव पेठ, पुणे, 30.

नाव : मिलिंद मंदार नाईक  दिनांक : 02/02/23

क्रमांक: 1 2 3 0 4

चुकीच्या पद्धती

योग्य पद्धत

उत्तरे भरण्यासाठी सूचना
1) आपले उत्तर शेजारी दिलेल्या उदाहरणाप्रमाणे भरावे.
2) प्रत्येक प्रश्नाचे एकच उत्तर बरोबर आहे व एकदा दिलेले उत्तर बदलता येणार नाही.
3) गोल काळा करण्यासाठी काळ्या रंगाच्या बॉलपेनचा वापर करा. काळा केलेला गोल बदलण्याचा प्रयत्न करू नका.
4) कृपया पूर्ण गोल काळा करा, पेन्सिलचा वापर करू नका.
5) कृपया उत्तरपत्रिकेवर कच्चे काम आणि खाडाखोड करू नका.
6) आधी काळा केलेला गोल पुसण्यासाठी खोडरबर किंवा व्हाईटनर चा उपयोग करू नका.
7) एका उत्तराला एकापेक्षा जास्त गोल काळे केल्यास ते चुकीचे धरले जाईल आणि त्याला गुण दिले जाणार नाहीत.

Example: X = A ● C   Y = A B ●

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | A | B | C | 26 | A | B | C | 51 | A | B | C |
| 2 | A | B | C | 27 | A | B | C | 52 | A | B | C |
| 3 | A | B | C | 28 | A | B | C | 53 | A | B | C |
| 4 | A | B | C | 29 | A | B | C | 54 | A | B | C |
| 5 | A | B | C | 30 | A | B | C | 55 | A | B | C |
| 6 | A | B | C | 31 | A | B | C | 56 | A | B | C |

# ज्ञान प्रबोधिनी प्रशाला

## ५वी प्रवेश चाचणीचे तपशील

### चाचणी १

| | |
|---|---|
| **चाचणीचे विषय :** | मानसशास्त्रीय चाचणी |
| **माध्यम :** | मराठी किंवा इंग्रजी |
| **वेळ :** | एकूण सुमारे २ तास |
| **स्वरूप :** | वस्तुनिष्ठ , बहुपर्यायी , छोट्या कालावधीच्या अनेक चाचण्या |
| **साहित्य :** | काळ्या रंगाचे दोन बॉलपेन्स |
| **चाचणीचा दिवस :** | **रविवार दि. २३ फेब्रुवारी २०२०** |
| **वेळ :** | सत्र १ - स. ८. ३० ते १०.३०<br>**किंवा**<br>सत्र २ - दु. १२.०० ते २.००<br>**किंवा**<br>सत्र ३ - दु. ३.३० ते ५.३० |
| **निकाल :** | **गुरूवार दि. १२ मार्च २०२० , सायं. ५.००** |

### चाचणी २

**(प्रथम चाचणीत निवड झालेल्यांसाठी)**

| | |
|---|---|
| **चाचणीचे विषय :** | मानसशास्त्रीय चाचणी |
| **माध्यम :** | मराठी किंवा इंग्रजी |
| **वेळ :** | एकूण सुमारे २ तास |
| **स्वरूप :** | वस्तुनिष्ठ , बहुपर्यायी , छोट्या कालावधीच्या अनेक चाचण्या |
| साहित्य : | टोक केलेल्या दोन पेन्सिली, खोडरबर व टोकयंत्र |
| **चाचणीचा दिवस :** | **रविवार दि. १५ मार्च २०२०** |
| **वेळ :** | स. ८.०० ते १० .३० |
| **निकाल :** | **शुक्रवार दि. २७ मार्च २०२०, सायं. ५.००** |